सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, १० नोव्हेंबर २०२३



# मावळतीची सूर्यकिरणे पितळी उंबऱ्यापर्यंतच

## श्री अंबाबाई मंदिरात किरणोत्सवास प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरातील किरणोत्सवाच्या पहिल्या दिवशी आज मावळतीची सूर्यकिरणे मंदिरातील पितळी उंबऱ्यापर्यंतच पोहोचली. ढगाळ वातावरणामुळे ती पुढे न सरकल्याने मूर्तीपर्यंत पोहोचू शकली नाहीत. दरम्यान, महाद्वार रोडवर किरणांची तीव्रता अपेक्षेपेक्षा अधिक होती. मात्र, किरणांच्या पुढच्या प्रवासात ढग आडवे आल्याने तीव्रता कमी झाली, असे प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी सांगितले.

पहिल्या दिवशी किरणे मूर्तीला चरणस्पर्श करतात. दुसऱ्या दिवशी मूर्तीच्या कमरेपर्यंत आणि तिसऱ्या दिवशी ती मुखकमलापर्यंत पोहोचतात. मात्र, गेल्या काही वर्षांत किरणोत्सवाच्या तारखा बदलल्या आहेत का, याचा अभ्यास किरणोत्सव समितीकडूनसुरू आहे.

दोन दिवसांतील किरणांची तीव्रता पाहाता आज मूर्तीच्या चरणापर्यंत किरणे पोहोचतील, अशी अपेक्षा होती. मात्र, सायंकाळी पाच वाजून ३२ मिनिटांनी ती पितळी उंबऱ्यापर्यंत आली आणि ढग आडवा आल्याने पुढचा प्रवास थांबला. दरम्यान, या वेळी देवस्थान समितीचे सचिव सुशांत बनसोडे, मंदिर व्यवस्थापक महादेव दिंडे, विवेकानंद कॉलेजच्या नेहा शिंदे आदी उपस्थित होते. देवस्थान समितीने मंदिर परिसरात किरणोत्सवाचे थेट प्रसारण पहाता यावे, यासाठी एलईडी स्क्रीन उभारले आहेत.



**कोल्हापूर : श्री अंबाबाई मंदिरात गुरुवारपासून किरणोत्सवाला प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मावळतीची सूर्यकिरणे पितळी उंबऱ्यापर्यंतच पोचली.**

**किरणांचा प्रवास असा...**

• सायंकाळी ५ : गरुड मंडप • पाच वाजून सात मिनिटे : गरुड मंडप जिना, • पाच वाजून २१ मिनिटे : गणपती मंदिर चौक • पाच वाजून ३२ मिनिटे : पितळी उंबरा